## नियमित दिवाणी दावा क्र. ६९/२०१३
## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००३०८–२०१३

### निशाणी क्र. ९१ वरील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, सदरचा दावा वादीने वाटपासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यात अनावधानाने स.नं.१७ हि.नं. ३/५ ही मिळकत सामील करणेची राहून गेली आहे. सदर मिळकत ही वाटप कामासाठी आवश्यक असून नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने ती दाव्यात सामील करणे गरजेचे आहे. तरी खालीलप्रमाणे सदर मिळकत या दाव्याच्या कामी सामील करणेस व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी असावी. दावा कलम १ मधील ड मिळकतीमधील अ.क्र.३ च्या मिळकतीनंतर अ.क्र.४ म्हणून खालीलप्रमाणे मिळकत समाविष्ठ करणेत यावी.

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १७ | ३/५ | ०–०३–०० | ०–०५ | संक्रात |

वरील प्रमाणे मिळकत समील करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी असावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचा स.नं. १७ हि.नं. ३/५ या मिळकतीशी कुठलाही संबंध नाही. सबब, सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा हा वाटप व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दावा मिळकतीमधील वादीच्या व प्रतिवादीच्या हक्काबाबत निराकारण करणे सोईचे होणारे आहे. कायदयाच्या प्रस्थापीत तत्त्वानुसार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याच्या गुणावगुणांचा विचार करणे जरुरीचे नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चा मूळ उद्देश असा की, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मूळ मुद्दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थीती अभिलेखावर आणून योग्य न्याय व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर अर्जामध्ये तथ्य असून सदरची दुरुस्ती ही न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे मुळ दाव्यात बदल होणार नाही. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे निराकरण होण्यासाठी अर्जातील दुरुस्ती करणेस हरकत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

३. वादी यांनी आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.10.11 17:23:32 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः ०९/१०/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.